# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.04.2024** **वार:रविवार**

---

1. केंद्र सरकारकडून कांदा निर्यातीला परवानगी
2. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचारात प्रमुख राष्ट्रीय नेत्यांचा सहभाग
3. आत्मनिर्भर भारत आणि स्टार्ट अप इंडिया सारख्या उपक्रमांद्वारे रोजगार निर्मितीला चालना दिल्याचं पंतप्रधानांचं कोल्हापुरातल्या सभेत प्रतिपादन आणि
4. तीरंदाजीच्या विश्वकरंडक स्पर्धेत भारताच्या ज्योती वेन्नम हिची तिहेरी सुवर्णपदकाची कामगिरी

**कांदा निर्यात**

केंद्र सरकारनं 99 हजार मेट्रीक टन कांद्याच्या निर्यातीला परवानगी दिली आहे. बांग्लादेश, संयुक्त अरब अमिराती, भूतान, बहारिन, मॉरिशस आणि श्रीलंका या सहा देशांमध्ये शेतकऱ्यांना कांदा निर्यात करता येईल. याबरोबरच खास निर्यातीसाठी उत्पादित केलेला दोन हजार मेट्रीक टन पांढरा कांदा पश्चिम आशिया आणि काही युरोपीय देशांना निर्यात करण्यास परवानगी देण्यात आली आहे. 2023-24 च्या खरीप आणि रब्बी हंगामात कांद्याचं उत्पादन घटलं होतं. त्यामुळे कांद्याचा देशांतर्गत पुरवठा सुरळित राहावा आणि किमतीवर परिणाम होऊ नयेत म्हणून केंद्र सरकारनं गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात कांदानिर्यातीवर बंदी घातली होती.

दरम्यान, या वर्षी कांद्याच्या राखीव साठ्यासाठी पाच लाख टन कांदाखरेदीचं उद्दीष्ट ठेवण्यात आलं आहे, अशी माहिती ग्राहक व्यवहार मंत्रालयानं दिली. या कांद्याच्या सुरक्षित साठवणुकीसाठी शीतगृहांची साठवणूक क्षमता पाच हजार मेट्रीक टनपर्यंत वाढवण्यात आल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. केंद्र सरकारचा कांदा निर्यातीवरील बंदी उठवण्याचा निर्णय स्वागतार्ह असून सरकार नेहमी शेतकऱ्यांच्या हितासाठी कटीबद्ध असल्याची प्रतिक्रिया राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीत राज्यात तिसऱ्या टप्प्यात 7 मे रोजी तर चौथ्या टप्प्यात 13 मे रोजी मतदान होणार आहे. सर्वच राजकीय पक्षांचा या दोन्ही टप्प्यांसाठी जोरदार प्रचार सुरू आहे. राष्ट्रीय स्तरावरच्या प्रमुख नेत्यांच्या सभा आयोजित केल्या जात असून समाजातल्या विविध घटकांच्या बैठकी घेण्यावरही भर दिला जात आहे. कोल्हापूर जिल्ह्यातल्या कोल्हापूर आणि हातकणंगले लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या संजय मंडलिक आणि धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काल कोल्हापुरात जाहीर सभा झाली. गेल्या दहा वर्षांत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं देशासमोरील समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत असं मोदी या सभेत म्हणाले. सरकारनं देशातल्या महिला आणि युवा पिढीला नेहमीच प्राधान्य दिलं आहे. आत्मनिर्भर भारत आणि स्टार्ट अप इंडिया सारख्या उपक्रमांद्वारे रोजगार निर्मितीला चालना दिली आहे असं सांगून सत्तेत आल्यास मुद्रा योजनेअंतर्गत कर्जाची रक्कम दुप्पट करण्यात येईल असं आश्वासन मोदी यांनी दिलं. विरोधी इंडी आघाडी केवळ देशविरोधी आणि तिरस्काराचं राजकारण करत आहे अशी टीका त्यांनी केली.

कोल्हापुरात मुंबई बंगळूरू महामार्गाचं काम जोरात सुरू असून विमानतळाचंही विस्तारीकरण झालं आहे. शहरातल्या श्री अंबाबाई मंदिराचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा लवकरच पूर्णत्वास नेला जाईल असं मोदी यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगली जिल्ह्यात कडेगांव इथं महायुतीचे उमेदवार संजय पाटील यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली. केंद्र सरकारच्या पाठिंब्यामुळे दुष्काळी भागातल्या सिंचन योजना पूर्ण होत आहेत आणि तिथं मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होत आहे असं फडणवीस या सभेत म्हणाले.

भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी काल लातूरमध्ये विविध क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधला. 2047 च्या विकसित भारताची संकल्पना त्यांनी यावेळी स्पष्ट केली. तसंच गेल्या 10 वर्षात केंद्र सरकारनं केलेल्या विकासकामांची माहिती दिली. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी लातूर जिल्ह्यात उदगीरमध्ये काँग्रेसचे लातूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार शिवाजी काळगे यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. अब की बार जनता की सरकार, असा नारा देत मतदान करण्याआधी तुमच्या भविष्याचा विचार करा आणि मगच मतदान करा, असं आवाहन त्यांनी या सभेत केलं.

धुळे लोकसभा मतदार संघातल्या महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉक्टर शोभा बच्छाव यांच्या प्रचारासाठी काल जिल्ह्यात काँग्रेसनं मतदार आणि कार्यकर्ता मेळावे घेतले. भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी धुळे लोकसभेच्या विकासासाठी कोणताही निधी आणला नाही. त्यामुळे मतदारासंघात बेरोजगारी वाढली आहे अशी टीका आमदार कुणाल पाटील यांनी यावेळी केली. जालना मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांची काल प्रचारसभा झाली. भाजपा ही लोकसभा निवडणूक विकासाच्या मुद्द्यांवर लढत असल्याचं दानवे या सभेत म्हणाले.

**मोदी-पुणे सभा**

दरम्यान, पुणे जिल्ह्यातल्या पुणे, शिरूर, बारामती आणि मावळ लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उद्या पुण्यात जाहीर सभा होणार आहे. पंतप्रधानांच्या पुणे दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर अति महत्वाच्या व्यक्तींची सुरक्षा तसंच कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी काल रात्री 12 वाजल्यापासून ते 30 एप्रिल रोजी रात्री 12 वाजेपर्यंत पुणे शहर परिसरात पॅराग्लायडींग, हॉट बलुन सफारी, ड्रोन, मायक्रोलाईट एअरोप्लेन इत्यादी प्रकारच्या उड्डाणांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

**उमेदवारी**

भारतीय जनता पक्षानं उत्तर मध्य मुंबईतून ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांना उमेदवारी दिली आहे.

**मतदान जनजागृती - अहमदनगर**

लोकसभेच्या निवडणुकीत समाजातल्या सर्व घटकांचा जास्तीत जास्त सहभाग असावा यासाठी विविध माध्यमातून मतदार जागृती करण्यात येत आहे. तसंच मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं जात आहे. शिर्डी मतदार संघातील तृतीयपंथी मतदार दिशा शेख मतदानाचं आवाहन करताना म्हणाल्या......

**राष्ट्रीय बीज महोत्सव**

शेतकरी, स्वयंसेवी संस्था, संशोधक, सरकारी तसंच शैक्षणिक संस्था यांच्यात समन्वय वाढवून येणाऱ्या पिढ्यांसाठी आणि पर्यावरणाला अनुकूल असं सुरक्षित पोषक अन्न उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशानं नागपूरमध्ये राष्ट्रीय बीज महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. वनामती, आत्मा आणि बिजोत्सव समूह यांनी संयुक्तपणे तीन दिवसांच्या महोत्सवाचं आयोजन केलं आहे. यात पारंपरिक बियाण्यांचं प्रदर्शन, सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतमाल प्रदर्शन आणि विक्री, भरडधान्य पाककृती कार्यशाळा आणि पर्यावरण संतुलन विषयावर चित्रकला स्पर्धा आदी उपक्रम होत आहेत. शेतकऱ्यांसाठी विविध विषयांवर कार्यशाळांचं आयोजनही या महोत्सवात करण्यात आलं आहे.

**उद्घाटन-धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यात उमरगा इथं नव्यानं बांधलेल्या अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाच्या इमारतीचं उद्घाटन काल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरुण पेडणेकर तसंच न्यायमूर्ती रविंद्र घुगे यांच्या हस्ते झालं. न्यायालयाची वास्तू म्हणजे न्यायाचं मंदिर आहे. संविधानाला प्रमाण ग्रंथ म्हणून त्यानुसार आपल्या अडचणीवर मात करून मार्ग काढण्यासाठी नागरिक इथं येतात. त्या सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण न्यायव्यवस्थेतील घटक म्हणून कटिबद्ध होऊया असं आवाहन न्यायमूर्ती वराळे यांनी यावेळी उपस्थित विधीज्ञ आणि सर्व न्यायमूर्तींना केलं. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त यावेळी टाळ मृदुंगाच्या गजरात संविधान दिंडी काढण्यात आली तसंच महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलच्या वतीनं संविधानातील मूलमंत्र या पुस्तकाचं वाटप करण्यात आलं.

**निधन**

मराठी रंगभूमीवरचे ज्येष्ठ पार्श्वसंगीतकार आणि ध्वनि संयोजक दादा परसनाईक यांचं काल मुंबईत हृदय विकाराच्या झटक्यानं निधन झालं. 300 हून अधिक दूरचित्रवाणी मालिकांना आणि 1500 हून अधिक नाटकांना त्यांनी पार्श्वसंगीत दिलं होतं.

**निधन**

पुण्याचे माजी महापौर मोहनसिंग राजपाल यांचं काल पुण्यात दीर्घ आजाराने निधन झालं. ते 77 वर्षांचे होते. रास्ता पेठ सोमवार पेठ भागातून ते तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले होते. 2010 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे ते पुण्याचे महापौर झाले होते.

**जलतरण**

भारताचा जलतरणपटू श्रीहरी नटराज यानं काल मलेशियात झालेल्या 16 वर्षाखालील वयोगटासाठीच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत विजेतेपद मिळवलं. 100 मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात त्यानं 54 पूर्णांक 71 शतांश सेकंदात हे अंतर पार करत सुवर्णपदक पटकावलं.

**तीरंदाजी**

शांघाय इथं झालेल्या तीरंदाजीच्या विश्वकरंडक स्पर्धेत भारताच्या ज्योती सुरेखा वेन्नम हिनं तिहेरी सुवर्णपदक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केलं. जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेल्या ज्योतीनं पहिल्या क्रमांकावर असलेल्या मेक्सिकोच्या अँड्रीया बसेरा हिचा अटीतटीच्या अंतिम लढतीत पराभव करुन सुवर्णपदकावर नांव कोरलं. महिलांच्या सांघिक प्रकारात तिनं अदिती स्वामी आणि परनीत कौर यांच्या साथीनं तर मिश्र सांघिक प्रकारात अभिषेक वर्मासोबत सुवर्ण पदक पटकावलं. पुरुषांच्या सांघिक प्रकारात अभिषेक वर्मा, प्रियांश आणि प्रथमेश फुगे यांच्या संघानं नेदरलँड्सच्या संघावर विजय मिळवत सुवर्णपदक पटकावलं तर पुरुषांच्या वैयक्तिक स्पर्धेत भारताच्या प्रियांश यानं रौप्यपदक मिळवलं.

**हवामान**

कोकणात आज हवामान कोरडं राहील. काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवावाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून विदर्भातही तुरळक ठिकाणी विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.